महाराष्ट्र शासन
**महसूल व वन विभाग**
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय
नविन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, विधानभवन समोर, पुणे ४११ ००१
दुरध्वनी क्रमांक - ०२०/२६०५०००९ ई-मेल dlrmah.mah@nic.in

---

क्रमांक.भूमापन-२/ भूसंपादन / C.N.२५८४४७० /२०२६ पुणे, दिनांक /०२/२०२६

**प्रति,**
जिल्हाधिकारी
पुणे, सातारा, सांगली , कोल्हापूर , सोलापूर , मुंबई उपनगर, सिंधूदुर्ग, रत्नागिरी, रायगड,
ठाणे, पालघर,नाशिक, धुळे , जळगांव, नंदूरबार, अहमदनगर, छ.संभाजीनगर, परभणी,
धाराशीव, हिंगोली, जालना, नांदेड, लातूर, बीड, बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, अकोला,
वाशिम, नागपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा, गडचिरोली व चंद्रपूर

**विषय:- भूमि संपादन प्रकरणात कमी -जास्त पत्रक तयार करणे व ७/१२ अधिकार व नकाशे अद्यावत करणे.**

भूमि संपादन कायद्यातील तरतुदीस अनुसरून शासनाच्या विविध प्रयोजनासाठी खाजगी जमीनींचे संपादन करण्यात येते. अशा संपादनामुळे बाधित होणा-या जमीन धारकांचे क्षेत्र व आकार हे त्यांचे खात्यावरुन कमी होणे अत्यंत गरजेचे असल्यामुळे शेतक-याचे मुळ सर्व्हे नंबर / गट नंबर च्या क्षेत्र व आकारात किंवा गाव नमुना नंबर १ ते ५ मधील क्षेत्र व आकारात बदल करणेसाठी कमी-जास्ती पत्रक केले जाते. याबाबत कमी-जास्ती पत्रक करुन त्याचा अंमल ७/१२ सदरी घेवून भूमि अभिलेख अद्यावत झाल्याशिवाय भूमि संपादनाची प्रकरणे बंद करण्यात येवू नयेत व संयुक्त मोजणी नंतर निवाडा झाल्यावर लगेचच कमी-जास्ती पत्रक तयार करणेची कार्यवाही करण्यात यावी, याबाबत वेळोवेळी शासन स्तरावरुन सुचना देण्यात आलेल्या आहेत. तरीसुध्दा पुढील काही बाबी अद्यापही निदर्शनास येत आहेत.

१. अनेक शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक प्रकल्पांसाठी व प्रकल्पग्रस्तांचे पुर्नवसनासाठी भूमि संपादनाची कार्यवाही पुर्ण होवून भूमि संपादन कायद्या नुसार निवाडेही (ॲवार्ड) प्रसिध्द झालेले आहेत. परंतु त्यापूढील अभिलेख दुरुस्तीची म्हणजेच कमी-जास्ती पत्रक तयार करुन त्याचा अंमल ७/१२ सदरी अनेक प्रकरणांत झालेला नाही.

२. काही प्रकरणांमध्ये कमी-जास्ती पत्रक न झाल्यामुळे तसेच काही प्रकरणांत कमी-जास्ती पत्रक तयार करणेत आलेले आहे परंतु त्याचा अंमल ७/१२ मध्ये न झाल्यामुळे संबधीत धारकांची जमीन संपादीत होवूनही क्षेत्र व आकार कमी होत नाही. तसेच स.नं./ग.नं. ची विक्री करण्याची झाल्यास ७/१२ वरील संपादीत क्षेत्र कमी न झाल्यामुळे संपादीत क्षेत्रासह विक्री केली जाते व त्यामुळे कायदेशीर गुंतागुंत निर्माण होवून समस्या वाढतात. तसेच संबंधित क्षेत्रांचे नकाशे व ७/१२ यावरील सर्व्हे क्रमांक /गट क्रमांक व क्षेत्रात तफावत दिसुन येत आहे.

अंतीम निवाडा प्रसिध्द झालेल्या परंतु कमी-जास्ती पत्रके करणेवर प्रलंबित असलेल्या प्रकरणांबाबत जिल्हाधिका-यांमार्फत विशेष मोहिम हाती घेवुन पुढीलप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

आज अखेर सर्व शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक प्रकल्पांसाठी व प्रकल्पग्रस्तांचे पुर्नवसनासाठी करणेत आलेल्या निवाडा जाहीर झाल्यापर्यंतची कार्यवाही पूर्ण झालेल्या परंतु कमी-जास्ती पत्रके न झालेल्या भूसंपादन प्रकरणांची यादी सर्व भूमि संपादन अधिकाऱ्यांकडून तयार करणेत यावी. बरीचशी भुसंपादन कार्यालये संबधीत प्रकल्पाचे काम झाल्यानंतर बंद झाली आहेत, अनेक भुसंपादन कार्यालये दुस-या भूसंपादन कार्यालयात सामील केलेली आहेत, काही कार्यालये स्थलांतरीत झालेली आहेत. अशा वेळी मुळ भुसंपादन कार्यालय केव्हा बंद झाले, त्यांचेकडील अभिलेख कोणत्या कार्यालयास वर्ग करणेत आले आहेत याचा शोध घेवुन त्याप्रमाणे याद्या तयार करणेत याव्यात. सदर यादीसह सर्व प्रकरणी कमी-जास्ती पत्रके तयार करणेकामी प्रस्ताव खालील नमुद कागदपत्रांसह जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांचे यांचेकडे पाठवावेत.

१. संयुक्त मोजणी नकाशा व संयुक्त मोजणी पत्रक.
२. भुमि संपादन कायदा कलम ६ चे नोटीफिकेशन.
३. अंतिम जाहीर निवाडयाची प्रत.
४.भूमि संपादीत जमिनीची ताबेपावतीची नक्कल.
५. शेतसारा कमी करणेबाबतचे आदेश.
६. सरकारी मालकीचे सर्व्हेनंबर, ओढा, नाला, रस्ता, गायरान, स्मशानभूमि इं. पैकी काही क्षेत्र वर्ग करावे लांगत असल्यास तसे जमिन वर्ग केलेबाबतचे जिल्हाधिकारी यांचे अभिहस्तांकित आदेश.

उपरोक्त प्रमाणे कागदपत्रे जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, यांचे कडे पाठविल्यानंतर त्यानुसार करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचा आढावा वेळोवेळी घेण्यात यावा. तसेच भूमि अभिलेख विभागाकडून तयार झालेले कमी-जास्ती पत्रके तहसीलदार यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर त्याची सत्वर अंमलबजावणी करणे बाबत सर्व संबंधीतांना सूचना देण्यात याव्यात.

सदरची कार्यवाही सत्वर करण्यात यावी.

Digitally signed by
SUHAS KRISHNA DIWASE
Date: 12-02-2026
15:08:55

**डॉ. सुहास दिवसे (भा.प्र.से.)**
**जमाबंदी आयुक्त आणि संचालक**
**भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे**

प्रत : विभागीय आयुक्त पुणे, मुंबई, नाशिक, छ.संभाजीनगर, अमरावती व नागपूर यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : उप संचालक भूमि अभिलेख, पुणे, मुंबई, नाशिक, छ.संभाजीनगर, अमरावती व नागपूर यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.

प्रत : जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, पुणे, सातारा, सांगली ,कोल्हापूर , सोलापूर , मुंबईउपनगर, सिंधूदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, पालघर,नाशिक, धुळे , जळगांव, नंदूरबार, अहमदनगर, छ.संभाजीनगर, परभणी, धाराशीव, हिंगोली, जालना, नांदेड, लातूर, बीड, बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशिम, नागपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा, गडचिरोली व चंद्रपूर यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.